पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२४७/२०१७
दिनांक : १०/११/२०१७

प्रति,

मा.......................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **१७/११/२०१७** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१७/११/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2017 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.विधी समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १६**

दिनांक : **१७/११/२०१७** वेळ : दु. **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१७/११/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक **०६/११/२०१७** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक – १५**) सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वैद्यकीय उपअधिक्षकअभिनामाचे एकमेव पद पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१०० ग्रेड पे र.रु. ७६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. शासन पत्र क्र.पीएमसी-३०९७/१५६९/प्र.क्र.२५९/९८/नवि-२२, दि.२९ जून २००१ नुसार वैद्यकीय उपअधिक्षक पदावरील पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. "महापालिका सेवेतील वैद्यकीय शाखेकडील वर्ग २ मधील ज्येष्ठ अधिका-यांमधून की, त्यांनी सांविधिक विद्यापीठाची वैद्यकीय शाखेची पदव्युत्तर पदवी अथवा मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया यांनी मान्यता दिलेली तत्सम अर्हता धारण केलेली आहे व मोठ्या रुग्णालयामधील कामकाजाचा ५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे." प्रस्तुतचे पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.२८/०७/२०१७ रोजी पदोन्नती समिती आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने डॉ.शंकर बळवंत जाधव, फिजिशियन यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल या बाबींची पडताळणी करुन त्यांना पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० या वेतनश्रेणीमध्ये वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत प्रस्तुतच्या समितीने शिफारस केलेली आहे. सबब, डॉ. जाधव शंकर बळवंत, फिजिशियन यांना खुला (अनु. जाती) प्रवर्गामधून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६००या वेतनश्रेणीमध्ये वैद्यकीय उपअधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १७/११/२०१७ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**


विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी अभिनामाची १६ पदे पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता मा.महापालिका सभा ठराव क्र.२७३६, दि.१४/०६/१९९४ नुसार खालीलप्रमाणे अर्हता निश्चित करण्यात आलेली आहे. "पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी की ज्यांची महापालिका सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर वर्ग २ मध्ये १० वर्षे सेवा झालेली आहे" प्रस्तुतच्या संवर्गात रिक्त असणारी/होणारी पदे पदोन्नतीने भरण्याकरीता दि.२८/०७/२०१७ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व वैद्यकीय अधिकारी पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, गोपनीय अहवाल, सेवाज्येष्ठता, आरक्षण आणि मत्ता व दायित्व इ. सेवाविषयक तपशील पडताळून

खालीलप्रमाणे अधिका-यांना त्यांचे नावासमोर नमूद प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु. १५६००-३९१००ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | अधिका-याचे नाव | पदोन्नतीचा प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|
| १. | डॉ.भावसार शैलजा मनोज | वि.जा. (अ) | |
| २. | डॉ.ताडे प्रकाश हिंदूराव | अनु. जाती | दि.३०/११/२०१७रोजी पात्र |
| ३. | डॉ.साळवे सुनिता श्रीरंग | खुला(अनु. जाती) | |
| ४. | डॉ.इंजिनियर सुनिता शिवशंकर | खुला (वि.जा.(अ)) | |
| ५. | डॉ. तिरुमणी संगिता टी. | खुला (इ.मा.व.) | |
| ६. | डॉ. खरात मेघा रविंद्र | खुला (अनु. जाती) | दि.३०/११/२०१७रोजी पात्र |

त्याचप्रमाणे खुल्या प्रवर्गाची २ पदे रिक्त राहत असलेने महापालिका रुग्णालयीन प्रशासकीय कामकाजाच्या आवश्यकतेच्या दृष्टीने वैद्यकीय अधिकारी पदाचे दि.०१/०१/२०१६ रोजीचे अंतिम सेवाज्येष्ठता सूचीनुसार सेवाज्येष्ठ असलेले डॉ.फिरके राजेंद्र प्रल्हाद यांना खुला(इ.मा.व.) आणि डॉ.गोफणे लक्ष्मण पांडुरंग यांना खुला(भ.ज.(क)) प्रवर्गातून तात्पुरत्या(Ad-hoc) स्वरुपात वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सबब, डॉ.भावसार शैलजा मनोज, डॉ.ताडे प्रकाश हिंदूराव, डॉ.साळवे सुनिता श्रीरंग, डॉ.इंजिनियर सुनिता शिवशंकर, डॉ.तिरुमणी संगिता टी, आणि डॉ.खरात मेघा रविंद्र यांना त्यांचे नावासमोर उपरोक्त नमूद प्रवर्गातून 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेबाबत तसेच डॉ.फिरके राजेंद्र प्रल्हाद यांना खुला(इ.मा.व.) आणि डॉ.गोफणे लक्ष्मण पांडुरंग यांना खुला(भ.ज.(क)) प्रवर्गातून तात्पुरत्या (Ad-hoc) स्वरुपात 'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'या पदावर र.रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन र.रु. ६६०० या वेतनश्रेणी मध्ये पदोन्नती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक १७/११/२०१७ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२४७/२०१७
दिनांक : १०/११/२०१७ चे लगत.

टिप – प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.